# प्राजक्त

संस्थापक व आद्य संस्थापक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

वर्ष : ४२ अंक : फोन : ०२३१-२५४०४२७

कोल्हापूर ता. ऑक्टोबर, २०१३ किंमत २ रुपये

Reg. No. GR/RNP/KLP 136/09-11 Posted in Kolhapur

# आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

(खासगी वितरण)

अंक १७ वा ऑक्टोबर २०१३

वर्ष तिसरे, त्रैमासिक क्र. ३

Website : www.bhidekul.in

Email: office@bhidekul.in


## संपादकीय

भिडे प्रतिष्ठानकडे उपलब्ध असलेल्या पत्त्यांनुसार ''आम्ही भिडे'' अंकाचे वितरण करण्यात येत आहे. हा अंक भिडे कुटुंबीयांकरिता संपर्काचे माध्यम म्हणून मदत होत आहे. या शिवाय विचारांची देवाण घेवाण, माहिती, इत्यादीद्वारा संपर्क होत आहे. आधुनिक जगात दूरध्वनी, ई-मेल, फेसबुक, एस्. एम. एस्. किंवा अन्य संपर्कमाध्यमांद्वारे आपण तात्काळ संपर्क साधू शकतो. म्हणूनच 'आम्ही भिडे' अंकास एक वेगळेच स्थान आहे.

सन २०१४ जानेवारी मध्ये होणाऱ्या भिडे कुल संमेलनात प्रकाशित होणारा वार्षिक अंक रंगीत मुखपृष्ठासह सुमारे ६० पानांचा असेल. या अंकाकरिता लेख, कविता, निवडक साहित्य, विचारधारा असेल तर त्या आमच्याकडे जरूर पाठवाव्यात. 'आम्ही भिडे' चे सर्व अंक आपण विनामूल्य प्रत्येक भिडे कुटुंबीयांकडे पाठवीत असतो. तथापी त्यास खर्च तर येतोच, हा खर्च जाहिराती, देणगी यामधूनच जमा होत असतो. त्या अनुषंगाने या अंकाचा हेतू, प्रयत्न, स्वरूप व उपयुक्तता लक्षात घेऊन स्वेच्छेने यथाशक्ती जाहिराती किंवा देणगी या माध्यमातून केलेल्या योगदानाचे स्वागतच असेल !

**कार्यकारी संपादक**

## विवाह सुवर्णोत्सव

ज्या भिडे कुल बंधू, भगिनी आणि माहेरवाशिणी दाम्पत्यांच्या विवाहाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत किंवा झालेली आहेत अशा दाम्पत्यांनी लग्न झाल्यापासून आपल्या सहचारिणीच्या साथीने व्यतीत केलेल्या ५० वर्षातील एखादी संस्मरणीय आठवण, घटना किंवा अनुभव शब्दबद्ध करावेत. लेखन शक्यतो कमीतकमी शब्दांमध्ये (१५० शब्द) असावे. लेखाबरोबर दोघांचा फोटो पाठवावा. आपले लेख व फोटो १५ डिसेंबर २०१३ पर्यंत पाठवावेत. लेखनाबरोबर आपले नांव, पत्ता, संपर्क क्रमांक आणि घराणे लिहिणे आवश्यक आहे. आपली संस्मरणीय आठवण भिडे कुल संमेलन २०१४, जानेवारी मध्ये प्रकाशित होणाऱ्या 'आम्ही भिडे' वार्षिक अंकामध्ये प्रसिद्ध करण्यात येईल. याची नोंद घ्यावी. अधिक माहितीसाठी संपर्क दिलीप भिडे - ९६५७५४१२३६ किंवा ले. कर्नल सुनील भिडे - ९६२३०१७४४४

आपले लेख या अंकात पान नं. २ वरील पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर अथवा office@bhidekul.in या किंवा vinayak.bhide1965@gmail.com या ईमेल वर पाठवावेत.

## भिडे कुलसंमेलन - २०१४

**दि. ४ आणि ५ जानेवारी २०१४**

**स्थळ : शगुन हॉल**

४९/२, डी. एन. पाटकर स्मृति सभागृह,
MSEB ऑफिस जवळ, डोंबिवली (पूर्व)

**वेळ - दि. ४ जानेवारी दुपारी ४ ते**
**दि. ५ जानेवारी दुपारी ४ वाजे पर्यंत**

**संमेलन शुल्क - प्रतिव्यक्ती रु. ४००/-**

(चहा, नाश्ता, भोजनासह)

**ठळक कार्यक्रम**

**दि. ४-१-१४ रोजी**

संमेलन उद्घाटन, मनोरंजनात्मक कार्यक्रम, आणि भोजन

**दि. ५-१-१४**

**आम्ही भिडे १८ व्या अंकाचे प्रकाशन**
**विद्यार्थी गुणगौरव व ज्येष्ठांचा सत्कार**
**प्रतिष्ठानचे पुरस्कार वितरण**
**मनोरंजनात्मक आगळावेगळा कार्यक्रम**
**भोजनोत्तर खुली चर्चा व प्रत्यक्ष संवाद**

**विषय** - २०१५ संमेलन स्थळ, तसेच भिडे प्रतिष्ठानच्या आयोजित उपक्रमात सकारात्मक बदल हवा की नको, याबाबत सूचना, तक्रार, कौतुक इत्यादी बद्दल आपण सर्वजण एकत्र बसून एकमेकांमध्ये प्रत्यक्ष संवाद साधूया.

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.**

# भिडे प्रतिष्ठान तर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### ऑक्टोबर

१) कु. प्राची संजय भिडे -------- ०७
२) कु. प्रीती संजय भिडे -------- ०७
३) कु. प्राजक्ता सुरेन्द्र भिडे ------ ०७
४) श्री. शरद प्रभाकर भिडे, चिपळूण --- ०९
५) श्री. शेखर केशव भिडे ------- १२
६) कु. ऋषभ विक्रम भिडे, हैद्राबाद --- १५
७) श्री. रमेश महादेव भिडे ------- १६
८) श्री. रोहन सुनील भिडे ------- १६
९) सौ. माधवी प्रसाद भिडे ------- १७
१०) सौ. अपर्णा शरद भिडे ------- १७
११) श्रीमती प्रज्ञा वसंत भिडे ------ १७
१२) सौ. जान्हवी विवेक भिडे ------ १७
१३) सौ. प्रियांका सुरेन्द्र भिडे ------ १९
१४) श्री. अमित रवीन्द्र भिडे ------ १९
१५) श्री. अमेय अरविंद भिडे ------ २१
१६) श्री. चिंतामण नरहर भिडे ------ २१
१७) श्री. हर्षवर्धन श्रीकृष्ण भिडे ----- २२
१८) सौ. संध्या बळवंत भिडे ------ २२
१९) कु. सुप्रिता प्रसन्न भिडे ------- २४
२०) श्री. प्रकाश शंकर भिडे ------- २५
२१) श्री. सचिन बळवंत भिडे ------ २५
२२) सौ. नमिता नितीन भिडे ------ २८
२३) सौ. स्मीता श्रीधर भिडे, चिपळूण --- २८
२४) श्री.मिहिर नितीन भिडे ------ ३०
२५) श्री. बाळकृष्ण त्रिंबक भिडे ---- ३०

### नोव्हेंबर

०१) श्री. विठ्ठल दत्तात्रय भिडे, डोंबिवली --- ०१
०२) श्री. धनंजय काशिनाथ भिडे ------ ०२
३) कु. नृपजा सुनील भिडे -------- ०२
४) डॉ. संतोष शंकर भिडे --------- ०२
५) श्री. राजेन्द्र वासुदेव भिडे ------- ०३
६) सौ. सुलभा श्रीकृष्ण भिडे ------- ०३
७) श्री. परेश प्रशांत भिडे --------- ०५
८) सौ. शीतल सतीश गांगल ------- ०७
९) श्री. प्रभाकर लक्ष्मण भिडे ------- ०८
१०) सौ. सुवर्णरेखा आदित्य देवधर ---- ०८
११) श्री. प्रदीप जगन्नाथ भिडे -------- ०९
१२) श्री. संजीव केशव भिडे --------- ०९
१३) सौ. वृषाली पंकज भिडे --------- ०९
१४) श्री. संदीप बळवंत भिडे, अंमळनेर --- ११
१५) श्री. गिरीश शरद भिडे ---------- १२
१६) श्री. केदार सुभाष भिडे --------- १२
१७) सौ. वीणा सच्चिदानंद वेलणकर ---- १२
१८) श्री. सचिन श्रीकांत भिडे -------- १४
१९) श्री. श्रीपाद श्रीकांत भिडे ------- १५
२०) श्री. चंदन चिंतामण भिडे -------- १६
२१) कु. राजश्री माधव भिडे --------- १८
२२) श्री. चंद्रकांत शंकर भिडे ------- १९
२३) सौ. शोभा शरद भिडे ---------- १९
२४) श्री. तेजस राजाराम भिडे ------- २०
२५) श्री. अजित चिंतामणी भिडे ------ २०
२६) श्री. अशोक लक्ष्मण भिडे ------- २२
२७) श्री. सतीश केशव भिडे -------- २३
२८) कु. स्वप्नाली प्रसन्न भिडे ------- २३
२९) श्री. केदार प्रभाकर भिडे -------- २३
३०) सौ. सुचेता मधुकर भिडे -------- २४
३१) श्री. अविनाश मधुकर भिडे ------- २५
३२) श्री. योगेश शरद भिडे --------- २५
३३) सौ. प्रीती विवेक पाटणकर ------ २५
३४) श्री. एस्. ए. कृष्ण भिडे -------- २५
३५) सौ. मालिनी शरद भिडे -------- २९
३६) श्री. सुहास सुभाष भिडे -------- ३०
३७) श्री. गुरुनाथ श्रीधर भिडे -------- ३०

### डिसेंबर

०१) सौ. लता वसंत भिडे ---------- ०१
०२) सौ. ज्योत्स्ना शरद भिडे -------- ०१
३) कु. जय प्रवीण भिडे ---------- ०२
४) सौ. शिल्पा श्रीकृष्ण भिडे -------- ०२
५) श्री. सुरेन्द्र बळवंत भिडे -------- ०३
६) श्री. वीरेन्द्र विश्वनाथ भिडे ------- ०४
७) श्री. सिद्धेश्वर बाळकृष्ण भिडे ------ ०४
८) श्री. अविनाश वासुदेव भिडे ------- ०५
९) श्री. वामन नरहर भिडे --------- ०५
१०) श्री. सदानंद यशवंत भिडे ------- ०६
११) श्री. रोहित प्रकाश भिडे -------- १०
१२) श्री. सुभाष वामन भिडे -------- १२
१३) सौ. कविता प्रवीण भिडे -------- १४
१४) श्री. प्रशांत त्रिंबक भिडे -------- १५
१५) श्रीमती चित्रा चंद्रकांत करंदीकर ---- १७
१६) सौ. रजनी काशिनाथ भिडे ------- २०
१७) सौ. सूरश्री चंदन भिडे --------- २१
१८) श्री. श्रीकृष्ण विश्वनाथ भिडे ------ २२
१९) श्री. तेजस श्रीकृष्ण भिडे -------- २२
२०) सौ. गायत्री केदार भिडे -------- २३
२१) श्री. दिलीप रघुनाथ भिडे ------- २४
२२) सौ. वंदना अरविंद भिडे -------- २४
२३) सौ. सीमा विजय गांगल -------- २४
२४) कु. राजस माधव भिडे --------- २४
२५) श्री. दिलीप वासुदेव भिडे ------- २६
२६) श्री. नितीन दिनकर भिडे -------- २६
२७) श्री. विक्रम विलास भिडे, हैद्राबाद --- २६
२८) श्री. गोविंद मुकुंद भिडे --------- २७
२९) कु. राजस नितीन भिडे --------- २७
३०) श्री. संदीप शरद भिडे --------- २८
३१) श्री. चारुचंद्र चिंतामणि भिडे ----- २९
३२) सौ. विजयश्री मिलिंद भिडे ------- २९
३३) श्री. वामन गणेश भिडे -------- २९

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
पुणे कार्यालय : ९२, शुक्रवार पेठ, रंजन को.-ऑप. हौसिंग सोसायटी, मंडई गणपती जवळ, पुणे - ४११ ००२
फोन : दिलीप भिडे ९६५७५४१२३६

❖ पत्रव्यवहारासाठी पत्ता ❖
विनायक वि. भिडे
५५३, नारायण पेठ, माती गणपती जवळ, भिडे वाडा, पुणे ४११ ०३०.
फोन - २४४५३२७४ मोबा : ९५५२२ १६९६७

आम्ही भिडे (अंक १२ वा)

**संपादक मंडळ**

संपादक - श्री. शशिकुमार केशव भिडे.
कार्यकारी संपादक - श्री. विजय अ. भिडे
संपादक मंडळ - श्री. प्रभाकर भिडे, श्री. दिलीप भिडे, श्री. श. ह. भिडे, चिंतामणी भिडे, ले. कर्नल (नि.) सुनील भिडे, सौ. प्रिया भिडे, श्री. अरविंद भिडे
**सल्लागार मंडळ** -
श्री. सुनील वा. भिडे (अभिरुची), के.मो. भिडे श्रीमती शशिताई घुले, श्री अजय भा. भिडे
अक्षर जुळणी - श्री. विनायक भिडे (पुणे)

## ‘आम्ही भिडे’ जाहिरात दरपत्रक

१) त्रैमासिक/वार्षिक पूर्ण पान साधे (ब्लॅक ॲन्ड व्हाइट) -------------- रु.२,०००/-
२) त्रैमासिक/वार्षिक अर्धेपान साधे (ब्लॅक ॲन्ड व्हाइट) -------------- रु.१,०००/-
३) त्रैमासिक/वार्षिक पाव पान साधे (ब्लॅक ॲन्ड व्हाइट) -------------- रु.५००/-
४) त्रैमासिक/वार्षिक शुभेच्छा पट्टी ब्लॅक ॲन्ड व्हाइट- -------------- रु.५००/-
५) वार्षिक अंक प्रायोजकत्व -------------- रु. ३०,०००/-
६) त्रैमासिक अंक प्रायोजकत्व -------------- रु. ८,०००/-

## प्रतिबिंब

# श्री. प्रदीप वासुदेव व डॉ. शीला भिडे यांचा परिचय

शब्दांकन : दिलीप वा. भिडे (पुणे) ९६५७५४१२३६

**शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।**
**साधवो नही सर्वत्र चंदनं न वने वने ।**

प्रत्येक पर्वतावर रत्ने सापडत नाहीत, प्रत्येक हत्तीच्या गंडस्थळावर मोती आढळत नाही. प्रत्येक वनात चंदनवृक्ष आढळून येत नाही. साधूपुरुष सर्वत्र सापडत नाहीत. त्याच प्रमाणे आडिवरे-वाई वंशातील कै. वासुदेवराव, त्यांचे सुपुत्र प्रदीपराव आणि स्नुषा डॉ. शीलाताई हे तीनही बुद्धिमान सनदी अधिकारी एकाच घरामध्ये जन्माला येणे हा विधात्याचा अद्भुत चमत्कारच आहे.

प्रदीप भिडे यांचे कुटुंब मूळचे राजापूरच्या आडिवरेचे. तिथून ते वाईला आले. आजोबा कै. महादेव मात्र पुण्यात आले. आजोबांची नोकरी गेल्यावर वडील वासुदेवराव व काकांना बालपणातच कौटुंबिक जबाबदारी सांभाळावी लागली. प्रदीप भिडे यांच्या मातोश्री माहेरच्या सुशीला बापट. या रत्नागिरीच्या.



प्रदीपजींचे शालेय शिक्षण लखनौ येथे झाले. १९७० मध्ये सेंट स्टीफन्समध्ये केमिस्ट्री ऑनर्स आणि ७३ साली दिल्ली विद्यापीठातून एल.एल.बी. केल्यानंतर आंध्र प्रदेश केडर मधील प्रशासकीय सेवेत सनदी अधिकारी म्हणून रुजू झाले. त्यांच्या पत्नी सौ. शीलाताईंचा जन्म चीनमध्ये झाला. शीलाताईंचं महाविद्यालयीन शिक्षण पुण्यात झाले. त्यांनी अर्थशास्त्रात एम.ए. करून रानडे इन्स्टिट्यूट मधून फ्रेंच भाषेचा डिप्लोमा, हार्वर्ड विद्यापीठातून सार्वजनिक प्रशासनात मास्टर्स, तसेच जिनेव्हा विद्यापीठातून आंतरराष्ट्रीय व्यापारात पी.एच.डी. आणि दिल्लीमध्ये एम.बी.ए. केले.

खरंतर १९७३ साली दोघेही सनदी अधिकारी प्रशिक्षणादरम्यान आंन्ध्रप्रदेश केडरमध्ये प्रथमच भेटले. त्या भेटीची परिणती सहजीवनात एकत्र येण्यात झाली. ४०वर्षे नंतर सनदी अधिकारी म्हणून निवृत्त होताना प्रदीपजी केंद्रीय महसूल सचीव तर शीलाताई इंडिया ट्रेड प्रमोशन ऑर्गनायझेशनच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक म्हणून निवृत्त झाल्या.

प्रदीपजींना इंग्रजी, हिंदी, मराठी व तेलगू या भाषा अवगत आहेत. पी. चिदंबरम् व श्री. प्रणव मुखर्जी अर्थमंत्री असतांना महसूल सचीव तर अरुण शौरींच्या मंत्रीपदाच्या काळात निर्गुंतवणूक खात्यात संयुक्त सचीव तर शिवराज पाटील गृहमंत्री असतांना विशेष सचीव होते. इंदिरा गांधी व राजीव गांधी सरकारमध्ये वित्तमंत्रालयात संचालक अशी वेगवेगळी जबाबदारीची पदे त्यांनी भूषविली आहेत. १९८८ ते ९२ या काळात ते वॉशिंग्टनमध्ये जागतिक बँकेत तांत्रिक सल्लागार होते. केंद्रात महसूल सचीव असतांना प्रदीपजींच्या दोन वर्षांच्या काळात त्यांनी सरकारी महसूल दुपटीने वाढविला. वित्तीय सुधारणा आणि विविध प्रक्रीया सुटसुटीत करण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती. प्रदीपजींनी महाराष्ट्र सदैव बाहेरूनच पाहिला असला तरीसुद्धा महाराष्ट्रातील लोकांनी आपल्या राज्यातून बाहेर यायला हवे. मराठी लोक हुषार आहेत त्यांचे शिक्षण उत्तम असते. त्यांनी सनदी सेवेत यायला हवे. तमिख,मल्याळम कुठेही जाऊन नोकरी करायला तयार असतात. परंतु आपल्या लोकांना मुंबई, पुणे व नाशिक बाहेर पडायची इच्छा नसते. या विचाराने मात्र ते खंतावून जातात. मंत्री आणि राजकीय नेत्यांशी फार जवळ जाण्याचा प्रदीपजींचा स्वभाव नाही. हा स्वभाव वडिलोपार्जित असल्याचे ते अभिमानाने सांगतात.

इंग्रजी, मराठी, हिंदी व तेलगू भाषांची जाण असलेल्या शीलाताईंनी परराष्ट्र मंत्रालयात आर्थिक सल्लागार, विशेष सचीव, तर संरक्षण मंत्रालयात अतिरिक्त सचीव आणि आर्थिक सल्लागार, कंपनी व्यवहार मंत्रालयात सचीव, आंन्ध्र सरकारमध्ये वित्त, उद्योग आणि वाणिज्य खात्यात सचीव अशी वाटचाल केली. २००७ मध्ये त्यांनी केंद्र सरकारात सार्वजनिक प्रशासन विभागात केलेल्या कामा बद्दल पंतप्रधानांच्या हस्ते विशेष पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले. निवृत्तीनंतरसुद्धा एल्. अँड टी. मेट्रो रेल्वे (हैद्राबाद), कोल इंडिया, नॉर्दन कोल फिल्डस् आणि सूर्योदय मायक्रो फायनान्समध्ये त्या स्वतंत्र संचालक म्हणून कार्यरत आहेत.

भिडे दाम्पत्याची सर्वाधिक कारकीर्द आन्ध्रमध्ये गेली. त्यामुळे आन्ध्र विषयी त्यांना आदर व आत्मीयता वाटते. प्रशासनात काम करतांना भरपूर समाधान मिळते कारण लोकांचे व राजकीय व्यवस्थेचे समर्थन मिळत असते. ४० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांना जे मिळाले त्याबद्दल ते उभयता समाधानी आहेत. भिडे दाम्पत्याला तीन मुली, सर्वात थोरली कन्या दिल्लीत ताज हॉटेलमध्ये मार्केटिंग संचालक आहेत. दुसरी कन्या अश्विनी, अमेरिकेत सॉफ्टवेअर तज्ञ आहे तर तिसरी अंजली दिल्लीमध्ये जर्मन सरकारच्या विकास विभागात सौर ऊर्जेच्या व्यापारीकरणाची जबाबदारी सांभाळत आहेत.

वैयक्तिक आवडीनिवडीतील भिन्नत्व आणि समानतेमुळे या उभयतांचा चार दशकांचा प्रवास वैशिष्ट्यपूर्ण ठरला आहे. प्रदीपजींना उत्तर भारतीय आहार तर शीलाताईंना मराठी जेवण आवडते. परंतु अर्थ विषयक नियतकालिकांची दोघांनाही विशेष आवड आहे. हिन्दुस्तानी शास्त्रीय संगीत आणि पं. भीमसेन जोशींचे मात्र दोघेही चाहते आहेत. आन्ध्रामध्ये व केंद्रात जबाबदारीच्या पदावर काम करतांना अतिशय महत्त्वाच्या आणि गोपनीय मुद्यांवर एकमेकांशी सल्लमसलत करून निर्णय घेण्याचा फायदा उभयतांना मिळाला. सनदी सेवेत अनेक संवेदनशील आणि गुंतागुंतीचे निर्णय घेण्यासाठी परस्परांचा हा अनुभव अतिशय उपयुक्त ठरला. सनदी सेवेतील प्रदीर्घ कारकिर्दीतील गमतीदार अनुभवांवर एक पुस्तक लिहून लोकांना हसविण्याचा त्यांचा विचार आहे. सध्या जरी दिल्ली सोडण्याचा विचार नसला तरी संधी मिळताच पुण्यात स्थायिक होण्याचा त्यांचा मानस आहे.

२००८ मध्ये भिडे कुलवृत्ताच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशन समारंभाकरिता त्यांना कामातील व्यस्ततेमुळे उपस्थित राहता आले नाही. परंतु दूरध्वनीवरून संपर्क करून २००९ मध्ये त्यांची पुण्यात प्रत्यक्ष भेट झाली. कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांचे समवेत आम्ही ५/६ भिडे त्यांचे बरोबर गप्पा मारत असतांना त्याचवेळेस माजी पोलीस आयुक्त जयंतराव उमराणीकर प्रदीपजींना म्हणाले एवढ्या लोकांना एकत्र जमवून काय करतो आहेस ? त्यावर प्रदीपजींनी त्यांना सांगितले की आम्ही सर्व भिडे एकत्र बसलो आहोत. उमराणीकर साहेबांनासुद्धा हे ऐकून बरे वाटले असेल. समाजाचा एक घटक म्हणून भिडे प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल ते आस्थेने विचारपूस करतात. २०१० मध्ये मुंडाजे (कर्नाटक) येथील भिडे संमेलनात या उभयतांना संमेलनाध्यक्षपद स्वीकारावे यासाठी आग्रह केला आणि त्यांनी आवर्जून उपस्थिती दिली. देशभरात कोठेही जावून देशाची सेवा करायला हवी, सनदी सेवेत जायला हवे. ही काळाची गरज आहे. असा सल्ला तरूण, गुणवान भिडे कुलोत्पन्नांना मात्र ते आवर्जून देतात.

**संदर्भ : लोकसत्ता, (श्री. सुनील चावके)**

## भावपूर्ण श्रद्धांजली

भिडे कुलातील खालील व्यक्तींना देवाज्ञा झाली, ईश्वर त्यांचे मृतात्म्यास सद्‌गती देवो ही प्रार्थना !

१) कै. जनार्दन भिडे, पुणे

## मदतीचा हात हवा

'आम्ही भिडे' अंकाकरिता पुण्यातून मराठी डी.टी.पी. किंवा संपादन विभागामध्ये सक्रीय मदत करू इच्छिणाऱ्यांनी संपर्क करावा. दिलीप भिडे - ९६५७५४१२३६, ले. क. सुनील भिडे - ९६२३०१७४४४, विनायक भिडे - ९५५२२१६९६७




## 'आम्ही भिडे' च्या १६ व्या अंकाचे प्रकाशन



प्रकाशनाचे वेळी डावीकडून दिलीप भिडे, प्रभाकरपंत भिडे, मुकुंदराव भिडे,
प्रमुख पाहुणे डॉ. वसंतराव काणे तसेच अध्यक्ष श्री. माधवराव भिडे,
श्री. शशिकुमार भिडे व श्री. अरविंद भिडे

**'आम्ही भिडे'** चे प्रकाशन कल्याण या ऐतिहासिक शहरात २८ जुलै चा रविवार उजाडला. कल्याण डोंबिवलीच्या भिडे मंडळींना उत्साहित करता झाला. या छोट्याशा अंकाच्या प्रकाशनाला ५०/६० मंडळी आली होती. बरोबर ४।। वाजता पुण्याहून 'आम्ही भिडे' मासिकाच्या नवीन प्रती घेऊन दिलीप, शशिकुमारजी, सुनील व अंकाचे सर्व काम करणारे विनायक ही भिडे मंडळी आली. मुंबईहून माधवराव व वसईहून मुकुंदराव भिडे आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कल्याणच्या अरविंद भिडे यांनी केले. मग रीतसर दीप प्रज्वलन प्रतिमेला हार व गणेश वंदन झाले. कार्यक्रमाच्या सूत्रसंचलनाची जबाबदारी कल्याणच्या प्रसिद्ध ॲडव्होकेट अलका भिडे यांनी स्वीकारली. पुण्याच्या दिलीप भिडे यांनी मासिकाचेसाठी काय काम करावे लागते, त्याची जुळणी कशी केली, जाहिराती कशा मिळविल्या या संबंधीचे निवेदन केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. वसंतराव काणे यांनी विविध कुलांनी एकत्र येऊन स्वतःचा विकास व प्रगती कशी करावी या संबंधी मार्गदर्शन केले. तसेच ते ज्या विविध संस्थांमध्ये समाजकार्य करतात त्याचे अनुभव सांगितले. त्यानंतर प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. माधवराव भिडे यांनी आपले कल्याणमधील वास्तव्य तसेच वडील नानासाहेब भिडे यांनी विद्यार्थ्यांकरिता केलेले काम तसेच डोंबिवली शहराचा इतिहास कसा लिहिला ते सांगितले. पुढे भारतीय रेल्वेमधील नोकरी, रेल्वेचे प्रमुख इंजिनियर म्हणून केलेले विविध ठिकाणच्या कामाचे अनुभव सांगितले. आता निवृत्तीनंतरही 'सॅटर्डे क्लब' ही संस्था स्थापन करून विविध मराठी उद्योजकांना येणाऱ्या अडचणी कशा सोडवतो या संबंधीचे अनेक अनुभव सांगितले. तरूण वर्गासाठी हा आदर्श वस्तुपाठच होता. भिडे प्रतिष्ठानचे सचिव प्रभाकर भिडे यांनी कुलवृत्ताच्या कामाचेवेळी कल्याणमधील भिडे मंडळींच्या आठवणी व वैशिष्ट्ये सांगितली. तसेच कल्याण या ऐतिहासिक शहराची माहिती सांगितली. असेच विविध लेख अंकात असून भिडे मंडळींनी ते वाचावे अशी सूचना केली.

कार्यक्रमाची सांगता डोंबिवली येथील प्रदीप भिडे यांच्या आभार प्रदर्शन व नंतर कु. मृण्मयी भिडे हिच्या पसायदानाच्या सुंदर गायनाने झाली. शेवटी सगळ्यांनी उपमा व चहा यांचा आस्वाद घेतला.

**प्रभाकर शंकर भिडे, डोंबिवली**
**मो. ९८९२५६३१५४**

---

## आवाहन

सौ. स्वप्ना सुनील भिडे, पुणे या कुलभगिनी कर्करोगाने आजारी आहेत. त्यांनी औषधोपचाराकरिता नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानकडे मदतीचा हात मागितला आहे. अंदाजे खर्च रु. ३,५०,०००/- इतका आहे. भिडे प्रतिष्ठानने वैद्यकीय मदत निधी मधून रु. १०,०००/- त्यांना तातडीने देऊ केले आहेत. ज्या कुलबंधू/ भगिनी/ माहेरवाशिणींना मदत द्यायची असेल त्यांनी ती भिडे प्रतिष्ठानच्या वैद्यकीय मदत निधीस द्यावी ही विनंती !

आपले धनादेश **'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान'** या नावानेच द्यावेत/पाठवावेत.

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**
द्वारा - विनायक वि. भिडे,
५५३, नारायण पेठ, भिडे वाडा,
माती गणपती समोर,
पुणे - ४११ ०३०.
मो. ९५५२२१६९६७ आणि
ले. क. सुनील भिडे - ९६२३०१७४४४,
श्री. चिंतामणी भिडे (ठाणे) - ९८२११६०६७५
याशिवाय **ऑन लाइन मदत स्वीकारण्याकरिता -**
**ठाणे जनता सहकारी बँक, सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०.**
**खाते क्रमांक : १२९४,**
**RTGS Code - TJSB - 0000018.**

आपण या खात्यात परस्परही रक्कम भरू शकता मात्र पैसे भरल्याची काउंटर फॉईल प्रतिष्ठानकडे आठवणीने पाठवावी म्हणजे पासबुकमध्ये होणारी नोंद तपासून बघता येईल.

## अभिनंदन !

मुली सासरी येताना माहेरच्या संस्कारांचा वारसा सासरीसुद्धा आणतात. त्यामुळे सासरचे नांवही उज्वल होते.



डॉ. स्मिता विजय भिडे, सध्या ठाणे येथे स्थित आहेत. या पूर्वाश्रमीच्या कु. स्मिता दत्तात्रय गोडबोले. डॉ. स्मिता भिडे यांनी नागपूर विद्यापीठाला 'एस्टिमेशन ऑफ ॲलोकेटिव्ह इफिशियन्सी इन इंडस्ट्री'या विषयावर प्रबंध सादर केला आणि नागपूर विद्यापीठाने त्यांना नुकतीच डॉक्टरेट पदवी प्रदान केली.

प्रबंधाचा विषय संख्याशास्त्रावर आधारित आहे. डॉ. सौ. भिडे यांचा जन्म नागपूरचाच. या शिवाय त्यांचा शिक्षणाचा प्रवास नागपूरमध्येच सुरू झाला. सध्या त्या ठाणे येथील जोशी बेडेकर महाविद्यालयात उपप्राचार्या असून संख्याशास्त्र आणि संगणकशास्त्र या विषयाच्या विभाग प्रमुखही आहेत.

माणूस साठीच्या जवळपास असतांना निवृत्तीचा विचार करतो परंतु स्मिता वहिनींनी मात्र वयाच्या ५६ व्या वर्षी मिळविलेली डॉक्टरेट ही पदवी भिड्यांच्या भावीपिढीला मात्र सदैव ज्ञानार्जनाचा संदेश देत राहील. लेखापरीक्षणाचे काम पाहणारे श्री. विजयराव रघुनाथ भिडे रा. ठाणे यांच्या डॉ. स्मिता या सुविद्य पत्नी आहेत.

# नवीन सदर

**ऑक्टोबर २०१३** च्या या अंकापासून **'प्रतिबिंब'** हे नवीन सदर सुरू केलेले आहे.ज्या भिडे कुलोत्पन्नाने एखादी **चमकदार, गौरवपूर्ण** कामगिरी केली आहे की ज्यायोगे समस्त भिडे कुटुंबीयांना त्याचा अभिमान वाटावा ! मग ते कलाक्षेत्र असो, सामाजिक, बौद्धिक क्षेत्र किंवा मनोरंजनात्मक क्षेत्र असो ! हे सदर दर अंकामध्ये प्रकाशित होणार असल्यामुळे आपली सर्व माहिती फोटोसह पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर किंवा office@bhidekul.in या ई-मेल वर पाठवावी. अधिक माहितीसाठी संपर्क -

**दिलीप भिडे – ९६५७५४१२३६**

**माधव भिडे – ९७६३७२७६८८**


Bhide ®

**BHIDE & SONS PVT. LTD.**

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

**AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES**

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : **5 to 10 H.P.**
Output Capacity : **500 Kg / hr.**
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**



Power Require : **15 to 20 H.P.**
Output Capacity : **1 Tonn / hr.**
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : **25 to 30 H.P.**
Output Capacity : **3 Tonn / hr.**
Motor Driven Model also available

**CHAFF CUTTER**



Power Require : **2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.**
Output Capacity : **200 Kg / hr., 400 Kg / hr., 900 Kg / hr.**
Motor driven & Engine Driven Model also available


**INDUSTRIAL PRODUCTS**

**PISTON VALVES**
**(FOR STEAM-LINE)**



**IBR & Non IBR Piston Valve**
**Class 150, Class 300 & PN 40**
**Size 15 mm to 150 mm**

**HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)**




**Pressure - From 30 kg/cm$^2$ to 300 kg/cm$^2$**
**Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.**

**CASTINGS**



Heavy C.I. Castings
Maximum single piece -
2 Tonn

**S.G.IRON FOR AUTO COMPONENTS**



Castings :
Steel, Stainless Steel & S.G. Iron
Range - From 1 kg. To 100 kg.

**LADDLE**



Foundry Crane Laddles
Capacity : Upto 20 Ton

## अभिनंदन !



अनंतरंग आर्ट फौंडेशन, पुणे प्रस्तुत चित्रकला प्रदर्शन नुकतेच दर्पण आर्ट गॅलरी, पुणे येथे संपन्न झाले. या संस्थेचे संस्थापक व चित्रगुरू श्री. अनंत महादेव भिडे यांचे शिष्य आणि प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. कुमार भिडे, सांगली यांचा नातू कु. ऋषिकेश नरेन्द्र देव याने स्वत: चितारलेल्या चित्रकृती प्रदर्शनात सादर करण्यात आल्या. चि. ऋषिकेशला लहानपणापासून चित्रकलेची आवड होती. दुसरीत असतानाच त्याने सकाळ बालकुमार चित्रकला स्पर्धेत बक्षीस मिळविले तसेच पेन्सील, कलर पेन्सील्स् आणि जलरंग या तिन्ही माध्यमातून तो चित्रे काढतो. २०१० पासून चित्रगुरू अनंत भिडे व त्यांचे चिरंजीव श्री. चित्रगुप्त यांचेकडे चित्रकलेचे शिक्षण घेत आहे. त्याच्या भावी उज्वल आयुष्यासाठी त्याला भिडे परिवाराकडून भरभरून शुभेच्छा !

## प्रतिसाद

'आम्ही भिडे' अंक १६ चे वाचक श्री. श्रीकांत भगवंत लोहोकरे रा. दक्षिण शिवाजीनगर, सांगली. यांना आपला 'आम्ही भिडे' अंक वाचायला मिळाला. त्यांनी भिडे नसूनसुद्धा उत्फूर्तपणे आपली प्रतिक्रीया श्री. दिलीप भिडे यांचेकडे पाठविली ती खालीलप्रमाणे -

'मास्तरीण रिटायर्ड झाली' हे काव्यपुष्प त्यांना भावले. या काव्यपुष्पाचे लेखक श्री. प्रभाकर वा. भिडे, डोंबिवली यांचे त्यांनी कौतुक केले आहे, तसेच सौ. स्वप्ना भिडे यांचेकरिता वैद्यकीय मदतीसाठी अंकामध्ये केलेल्या आवाहनानुसार श्री. लोहोकरे यांनी भिडे प्रतिष्ठानकडे रु. १,०००/- सुपूर्द केलेले आहेत. त्याचप्रमाणे सौ. स्वप्नाताईंच्या तब्येतीला योग्य तो आराम मिळावा व त्यांच्या कुटुंबावर ओढवलेले संकट लवकर दूर होऊन त्यांच्यावर देवाची कृपादृष्टी राहो अशी त्यांनी प्रार्थना केलेली आहे. त्याचप्रमाणे आपण मला प्रतिष्ठानचा सभासद करून घेतल्यास आनंद होईल असेही मनोगत व्यक्त केले आहे. तसेच भिडे प्रतिष्ठानच्या कार्यामध्ये अत्यंत प्रेमाने आपुलकीने व मनापासून काम करणाऱ्या आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना त्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. श्री. लोहोकरे सरांनी भिडे प्रतिष्ठानवर जो विश्वास आणि आपुलकी दाखविली हीच प्रतिष्ठानच्या कामाची पावती आहे. असेच प्रेम आमचेवर राहो हीच सदिच्छा !

## एक मजेदार किस्सा - हसना मना है, रेल्वे स्टेशनपर एक घंटा ।

**सौ. सुप्रिया मकरंद भिडे (नाशिक)**
**फोन : ०२५३-२५९५७२३**

व्यक्ती तितक्या प्रकृती, तितक्याच विकृती, विविध विचारधारा, तितक्याच गमती-जमती व तितकेच विनोद !

प्रत्येक व्यक्तीची वैचारिक दिशा वेगळीच असते. लहान मुलांचे तर विचारूच नका, इतके मजेदार किस्से असतात ना ! त्यांच्याशी बोलताना जपून बोलावे लागते. त्यांच्या बाल मनात कसे कसे विचार चालू असतात देवच जाणे ! बाल मन अगदी अगम्यच असते. कधी कधी फार मजा येते. तर ऐकाच हा किस्सा.

गोष्ट मोठी गमतीदार आहे. शाळेच्या परीक्षा चालू होत्या. पाचवीचा हिंदीचा पेपर चालू होता. पाचवीसाठी हिंदी म्हणजे नवी भाषा नवे शब्द, नवे अर्थ ! बरे पाचवीच्या मुलांचा वयोगट केवळ १०-११ वर्षे. काही बिनधास्त मुले मजा करतात. ते धडाधड लिहून टाकतात. पटापट पेपर लिहून घरी येऊन आईला सांगायचे की पेपर अगदी सोप्पा गेला. आणि खेळायला जायचे. नो टेन्शन !

तर अशाच एका पाचवीच्या मुलाने हिंदीचा पेपर लिहिला. निबंध होता ''रेल्वे स्टेशन पर एक घंटा''

आता पाचवीच्या मुलाकडून काय अपेक्षा असणार ? त्याने रेल्वे स्टेशनवर १ तास कसा घालवला, रेल्वे प्लॅटफॉर्म वर काय काय पाहिले - त्याचे साधे १०-१२ ओळीत वर्णन - तेथील दृश्य, माणसांची गाडी पकडायची धावपळ, फेरीवाले, फळ विक्रेते, गर्दी वगैरे - बस्स इतकेच ! पण . . . . . लहान मुलांच्या डोक्यात केव्हा काय येईल, कधी सांगता येईल का ?

पाचवीच्या वर्गातल्या एका ''ढ'' म्हणवल्या जाणाऱ्या मुलाने निबंध चक्क असा लिहिला होता -

**रेल्वे स्टेशन पर एक घंटा - (हिंदी)**

मै पिछले हप्ते इतवार को मेरे पापा मम्मी के साथ दादर गया था । जैसेही रेलवे स्टेशन पर गया, वहाँ प्लेटफोर्म पर एक घंटा दिखी । घंटा बहुत बडी थी, वह लोहे की थी इसलिये काले रंग की थी । हर एक प्लेटफोर्म पर एक एक घंटा थी । हर प्लाटफोर्मकी घंटा रेलवे टाइम टेबलके मुताबिक बजती थी ।

दस बजे घंटा जोरसे बजी । घंटा की आवाज काफी तगडी थी । फिर थोडेही देरमे रेलगाडी आयी । लोग फटाफट अंदर गये । हम भी अंदर गये । घंटा फिरसे बजी और रेलगाडी तुरंत निकल पडी । इस प्रकार रेलवे स्टेशन पर घंटा का प्रयोग (उपयोग) लोगोंको आगाह करने के लिये बहुतही भली तरहसे, अनोखे ढंगसे किया जाता है । जिसकी वजहसे लोग रेल मे चढने-उतरने के लिये तैयार रहते है ।

घंटा तो मैने मंदिरमे बहुत बार देखी थी, किन्तु रेलवे स्टेशन पर घंटा देखकर पहले तो मै चौका था, मगर बादमें उसके अनोखे प्रयोग का भी पता चला और अच्छा लगा । इतनी बडी घंटा और इतने उंचाईपर कैसे टांगी होगी उसका बहोतही अचरज (आश्चर्य) हुवा, और उपर बिना कोई चढेही घंटा कैसे बजायी, वो तो मै सोचतेही रह गया । फिर मेरा स्टेशन आ गया और मै, माँ और पापाके साथ उतर गया और मार्केट होते हुए घंटाभरमे सीधा घर पहुँच गया ।

पाहिलंत त्या पाचवीच्या मुलाने कसा निबंध लिहिला तो ? पण तुम्ही सांगा यात चुकीचे तरी काय होते ? कारण तो निबंध होता. त्या मुलाची कल्पनाशक्तीही चांगली होती. मुद्दे विषयाला धरूनच असल्याने बऱ्यापैकी मार्क त्याला मिळाले होते. याला खरेतर प्रसंगावधानच म्हणायला हवे. शिवाय जरा हटके विचार करण्याची वृत्ती ! हीच तर खरी हुशारी. येत नाही म्हणून नुसता ठोंब्यासारखा बसला नाही. प्रश्न सोडून दिला नाही. तर वेळ मारून नेली आणि जे सुचेल ते लिहिले. ही हुशारीच तर आयुष्यात पुढे कामी येते. जगावेगळा व चौकटीबाहेर विचार करणारी अशी मुलेच पुढे खूप प्रगती करतात. असा शिक्षण तज्ज्ञांचाही दावा आहे.

वाचकहो, या प्रसंगात एक विनोद वा गम्मत जरी असली तरी मोठ्यांनी एक गोष्ट मात्र लक्षात ठेवली पाहिजे, ती म्हणजे लहानांशी केवळ शाळेतच नव्हे तर घरी दारी सर्वत्रच अगदी तोलून मापून, जपून आणि परिस्थितीचे भान ठेवून खरंच खूप विचारपूर्वकच बोलले पाहिजे हे नक्की. कारण लहान मुलांची विचारशक्ती दहा दिशांना धावणारी व फार दांडगी असते. शिवाय त्यांच्या बाल मनावर होणारे वैचारिक ठसे खूप दाट आणि खोल असतात. ती मुले पुढे कोणत्या गोष्टींचा अर्थ कसा लावतील काही सांगता येत नाही ! खरे ना ?

■

## कुलवृत्त प्रत

**जानेवारी २००८ मध्ये प्रकाशित झालेल्या दुसऱ्या भिडे कुलवृत्ताच्या प्रति शिल्लक आहेत.**
**ज्यांना हव्या असतील त्यांनी संपर्क साधावा.**

(१) विजय भिडे, ठाणे - ९८३३०४५४६३ (२) ले. क. सुनील भिडे, पुणे - ९६२३०१७४४४



## विद्यार्थी गुणगौरव, पुरस्कार आणि ज्येष्ठांचे सत्कार याबाबत निवेदन.

## १० वी आणि १२ वी च्या यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन !

*दि. ४ व ५ जानेवारी २०१४ रोजी होणाऱ्या भिडे कुलसंमेलनात दर वर्षीप्रमाणे गुणगौरव/ज्येष्ठांचा सत्कार आणि पुरस्कार समारंभ संपन्न होणार आहे. खाली दिलेल्या गटातील निकषांनुसार माहिती ३० नोव्हेंबर २०१३ पर्यंत आयकार्ड फोटोसह खालील पत्त्यावर पाठवावी.*

**सौ. धनश्री श्रीनिवास भिडे** (प्रमुख, विद्यार्थी गुणगौरव योजना) ३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सीताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे – ४११ ०३०. ☎०२०–२४३३७४५५

### विशेष सूचना -

१) विद्यार्थी गुणगौरव योजनेचा फॉर्म याच अंकाच्या पान नं. १० वर दिलेला आहे. त्याची झेरॉक्स प्रत उपयोगात आणली तरी चालेल किंवा www.bhidekul.in या आपल्या वेबसाइटवरून तो फॉर्म डाउनलोड करून घ्यावा.

२) अपूर्ण माहितीचा विचार केला जाणार नाही.

३) एका पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची माहिती पाठवायची असल्यास या फॉर्मची झेरॉक्स प्रत उपयोगात आणावी.

४)पारितोषिकासाठी/पुरस्कारासाठी/सत्कारासाठी निवड झालेल्यांना पत्राने किंवा दूरध्वनीद्वारे संपर्क करून कळविले जाईल. त्या करिता आपला संपर्क क्रमांक तसेच आयकार्ड साइज फोटो देणे आवश्यक आहे.

५) पुरस्कारासाठी आपले नामांकन गटानुसार दिलेल्या निकषांप्रमाणे पाठवावे आणि त्या संबंधीच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात.

६) ज्येष्ठांच्या सत्काराकरिता आपले नांव, पत्ता, संपर्क क्रमांक, शिक्षण, व्यवसाय/नोकरी, सामाजिक कार्य व उल्लेखनीय कामगिरी, पारितोषिके इत्यादी माहिती कोऱ्या कागदावर शक्य असल्यास आयकार्ड फोटोसह लिहून पाठवावी.

७) विद्यार्थी गुणगौरव योजनेच्या गटातील निकषांनुसार २०१२–२०१३ या वर्षातील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी/विद्यार्थिनींनी माहिती पाठवावी.

**गट पहिला** - ४थी व ७वी च्या स्कॉलरशिप परीक्षेत यश मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (स्कॉलरशिप परीक्षेच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट दुसरा** - ५ वी ते ९वी पर्यंतच्या वार्षिक परीक्षेत सर्व तुकड्यात प्रथम क्रमांक मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी मुख्याध्यापकांचे प्रमाणपत्र व गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक.

**गट तिसरा** - दहावीच्या शालांत परीक्षेत ८० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालांन्त परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट चौथा** - १० वी च्या शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (शालांन्त परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक) (श्रीमती प्रियंवदा श्रीपाद भिडे, प्रभादेवी, मुंबई.
कै. श्रीपाद सखाराम भिडे, यांचे स्मरणार्थ

**गट पाचवा** - १२ वी च्या परीक्षेत सर्वाधिक गुण मिळवून यशस्वी होणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक) डॉ. सौ. शुभदा चारुचंद्र भिडे, सांगली (कै. के. वि. तथा दादूकाका भिडे, सांगली, यांचे स्मरणार्थ)

**गट सहावा** - १२ वी च्या परीक्षेत शास्त्र शाखेत ८० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे कला शाखेत ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे आणि वाणिज्य शाखेत ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. (उच्च माध्यमिक शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत जोडणे आवश्यक)

**गट सातवा** - १० वी च्या शालांत परीक्षेत मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी.
श्री बळवंत दत्तात्रय भिडे, अमळनेर (कै. सिंधू विनायक भिडे, यांचे स्मरणार्थ) (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट आठवा** - १० वी च्या शालांत परीक्षेत संस्कृत विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी. श्री. जनार्दन कृष्णाजी भिडे, विलेपार्ले, मुंबई, पुरस्कृत (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट नववा** - १० वी च्या शालांत परीक्षेत इंग्रजी विषयात सर्वाधिक गुण मिळविणारे विद्यार्थि/विद्यार्थिनी. (सौ. स्नेहा रमेश आपटे (भिडे) पुरस्कृत), त्यांचे वडील, (कै. दत्तात्रय विनायक भिडे, अमळनेर यांचे स्मरणार्थ) (शालांत परीक्षा मंडळाच्या गुणपत्रिकेची सत्यप्रत सोबत जोडणे आवश्यक)

**गट दहावा** - संगीत, नृत्य, नाट्य, गायन, वक्तृत्व आणि क्रीडा अशा विषयात विशेष प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनी. सदर प्राविण्य कुठल्या स्तरावर मिळविले आहे, याची माहिती व प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**गट अकरावा** - विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना : इरावती ट्रस्ट, दादर मुंबई यांच्या प्रमुख श्रीमती सुमित्रा मधुसूदन भिडे यांनी कै. त्रिंबक राजेश्वर भिडे आणि कै. जानकीबाई त्रिंबक भिडे यांचे स्मरणार्थ पुरस्कृत केलेली विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी मदत योजना खालीलप्रमाणे . . .

आर्थिक परिस्थितीमुळे अडचणीत असणाऱ्या कोणत्याही गुणवान, अभियांत्रिकी किंवा आर्किटेक्ट शाखेत शिक्षण घेत असलेल्या, भिडे कुलातील विद्यार्थी/विद्यार्थिनीला दरवर्षी सहाय्य देण्यासाठी पारितोषिक /मदतीची योजना आहे.

**गट बारावा -** श्री. प्रदीप वासुदेव भिडे (IAS) व डॉ. शीला प्रदीप भिडे, (IAS) दिल्ली पुरस्कृत गरजू व गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी/विद्यार्थिनींसाठी विशेष आर्थिक मदत.

## प्रतिष्ठानचे पुरस्कार

**गट तेरावा** - विशेष पारितोषिक कै. श्रीकृष्ण भिडे यांच्या स्मृति प्रीत्यर्थ ''साहस/क्रीडा पुरस्कार. या गटात ज्यांना अर्ज करावयाचे असतील त्यांनी आपले नांव, शिक्षण, कौटुंबिक माहिती आणि साहस/क्रीडा प्रकार याची माहिती वेगळ्या कागदावर सुवाच्य हस्ताक्षरात लिहून पाठवावी. या संदर्भात त्यांना मिळालेल्या प्रशस्तिपत्रक/पारितोषिक प्रमाणपत्राची एक सत्यप्रत समवेत जोडावी. श्री. रा. म. भिडे, पुणे (कै. श्रीकृष्ण भिडे स्मृति प्रतिष्ठानचे कै. श्रीकृष्ण भिडे यांचे स्मृतिप्रीत्यर्थ)

**गट चौदावा** - संगीत, नाट्य, चित्रपट क्षेत्रात खास कामगिरी करणारी खास भिडे व्यक्ती. (श्री. कुमार आणि वसंत विष्णु भिडे, सांगली. यांचे बंधु कै. सुभाष विष्णु भिडे, यांचे स्मरणार्थ)

**गट पंधरावा** - सौ. मेधा ऊर्फ अनुराधा अविनाश भिडे, मिरज पुरस्कृत ''आपली सून'' विशेष गौरव पुरस्कार, भिडे कुलातील कुणाचीही पत्नी, आई, अथवा सून यापैकी कुणीही. या पुरस्कारासाठी असलेले निकष खालीलप्रमाणे :–

१) सुसंस्कारांचा वारसा सतत पुढे नेण्याचे कार्य सातत्याने करणारी २) विशेष प्राविण्य किंवा विशेष पारितोषिक मिळालेली ३) समाज कार्यात अग्रेसर असणारी ४) अध्यात्मिक क्षेत्रात प्रचारकार्य करणारी ५) लेखन करणारी ६) प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांसाठी विशेष धडपड करणारी. वरीलपैकी कोणत्याही एक वा अनेक प्रकारे कार्य यशस्वीपणे करणाऱ्या स्त्री चे नामांकन, आई, पत्नी वा सुनेच्या गौरवासाठी घरातील पुरुष मंडळींनी पुढाकार घेऊन प्रतिष्ठानकडे आपणहून नाव सुचवावे.

**गट सोळावा ''माझी आई'' पुरस्कार** - २०१४ साला पासून नव्याने सुरू होत असलेला हा पुरस्कार कै. सुशीला रावजी भिडे यांचे स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव रविंद्र रावजी भिडे, कल्याण, यांनी पुरस्कृत केला आहे. त्यासाठी गृहिणी, ज्येष्ठ स्त्री (वय ६० वर्षे किंवा त्यापुढील) असावी, तसेच अल्प उत्पन्न आणि प्रतिकूल परिस्थितीला तोंड देऊन मुलांकरिता किंवा स्वत:च्या कुटुंबाकरिता विशेष कार्य करणारी असावी.

**गट सतरावा - उद्योजक पुरस्कार** - कै. विष्णू विनायक तथा अण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली, यांनी सदर पुरस्कार जाहीर केलेला आहे.

**❖ ७५ वर्षे किंवा त्यावरील सत्कारार्थी ज्येष्ठ कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींनी फोटोसह माहिती पाठवावी ❖**

## विद्यार्थी गुणगौरव योजना फॉर्म

**अ**

पालक/वडील/आईचा
सभासद क्रमांक :

**(विद्यार्थ्याने संपूर्ण माहिती स्वत:च्या हस्ताक्षरात भरावी)**

१)संपूर्ण नाव
२)जन्म दिनांक जन्म ठिकाण
३)आजपर्यंत झालेला अभ्यासक्रम

४)पुढे काय शिकणार व कोणत्या गावी

५)सध्या शिकत असलेल्या शिक्षण संस्थेचे संपूर्ण नाव व पत्ता

६)विद्यार्थ्याच्या वडिलांचे संपूर्ण नाव व नोकरी/व्यवसाय करीत असल्यास तेथील हुद्दा व पूर्ण पत्ता

दूरध्वनी/मोबा.

७)विद्यार्थ्याची आई नोकरी/व्यवसाय करीत असल्यास तेथील हुद्दा व पूर्ण पत्ता

दूरध्वनी/मोबा.

८)अ) विद्यार्थ्याच्या पालकांचे नाव व पूर्ण पत्ता

दूरध्वनी/मोबा.

ब) पालकाचे अर्जदार विद्यार्थ्याशी नाते
९)अ) पत्रव्यवहाराचा पत्ता

ब) कायम राहण्याचा घरचा पत्ता

१०)कुठल्या गटातील गुणगौरव योजनेसाठी आपण माहिती सादर करीत आहात ?

११)सोबत जोडलेल्या प्रमाणपत्रांचा तपशील

दिनांक : (विद्यार्थ्याची स्वाक्षरी)

**ब**

(वडिलांनी/पालकाने भरावयाची माहिती)

१) अर्जदाराच्या वडिलांचे आणि त्याच्या कुटुंबातील इतर सर्व व्यक्तींचे एकूण वार्षिक उत्पन्न : रुपये (अक्षरी)
२) विद्यार्थी गुणगौरव योजनेअंतर्गत आपल्या मुलाच्या/मुलींचा विचार करावयाचा असेल तर त्यासाठी आपण प्रतिष्ठानचे सदस्य असणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी. सदस्य नसलेले सदस्य होऊ शकतात. सदस्य होण्यासाठी भरावयाची रक्कम खालीलप्रमाणे आहे.

• आश्रयदाता : रु. १०,०००/- • हितचिंतक : रु. ५,०००/- • आजीव : रु. १,०००/-

पालकाची स्वाक्षरी

नाव :
पूर्ण पत्ता :

दूरध्वनी क्रमांक/मोबाईल :

दिनांक : सभासद क्र. :

विशेष सूचना :१) माहिती सुवाच्य अक्षरात संपूर्ण भरून दि. ३०/११/२०१३ पूर्वी पोहोचेल अशा बेताने खालील पत्त्यावर पाठवावी.

**डॉ. सौ. धनश्री श्रीनिवास भिडे, (विद्यार्थी गुणगौरव योजना प्रमुख)**

३, श्रीधर अपार्टमेंट, १२, सीताबाग कॉलनी, सिंहगड रस्ता, पुणे - ४११ ०३०. दूरध्वनी - ०२०-२४३३७४५५

# नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

(ई – २०१४० (मुंबई), दिनांक १६ एप्रिल २००२)
**रजि. ऑफिस** – १, सुरेश विठ्ठल व्हिला, १२ वा रस्ता, खार (पश्चिम), मुंबई – ४०० ०५२. दूरध्वनी : ६०५२६६४/५. E-mail:office@bhidekul.in
**पत्रव्यवहाराचा पत्ता :** ५५३, नारायण पेठ, भिडे वाडा, पुणे ४११ ०३० किंवा शिवानंद सोसायटी (बेसमेंट), सुळे पार्क, एम्. जी. रोड टाइम्स् ऑफ इंडिया शेजारी, नौपाडा ठाणे (प.) ४०० ६०२.

## सभासद अर्ज

**'नित्युंदन गोत्रीय भिडे'** प्रतिष्ठानचा मी सभासद होऊ इच्छितो.
प्रतिष्ठान तसेच कुलवृत्ताच्या संकलनाच्या कामात मी यथाशक्ती वेळ देऊ शकेन/शकणार नाही.
सभासद वर्ग : आश्रयदाता / हितचिंतक / आजीव

**अ) सभासद वर्ग :–**
१) आश्रयदाता : रु. १०,०००/– किंवा अधिक एकरकमी देणारे २) हितचिंतक : रु. ५,०००/– किंवा अधिक एकरकमी देणारे
३) आजीव : रु. १,०००/– किंवा अधिक एकरकमी देणारे

**ब) सूचना : –**
१) चेक/ड्राफ्ट मुंबई येथील बँकेवरील 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' या नावाने काढावा.
२) मुंबई बाहेरील बँकेचा चेक पाठवताना रु. ५०/– जास्त पाठवावेत.
३) प्रत्येकाने स्वतंत्र अर्ज भरावा. जरूर पडल्यास झेरॉक्स करून वापरावा.

वर्गणी रु. ________ रोख / डिमांड ड्राफ्टने / चेकने सोबत / मनीऑर्डरने वेगळी पाठवीत आहे.

संपूर्ण नांव ________________________________

जन्मतारीख ________________________________

संपूर्ण पत्ता ________________________________

(जवळच्या खुणेसह) ________________________________

दूरध्वनी क्रमांक ________ STD कोड ________

मोबाइल क्रमांक ________ E-mail : ________

व्यवसाय / नोकरी ________________ हुद्दा ________

संपूर्ण पत्ता : ________________________________

________________________________

दूरध्वनी क्रमांक : ________ E-mail : ________

तारीख सही ________

---

कार्यालयीन वापरासाठी

१) सभासद क्रमांक : ________ २) पावती क्रमांक : ________

तारीख कार्याध्यक्ष विश्वस्त

# जुलै २०१३ ते सप्टेंबर २०१३ पर्यंतचे देणगीदार

| | | |
|---|---|---|
| १) श्री. सुहास श्रीधर भिडे, सिंगापूर | रू.१०,०००/- | आश्रयदाता |
| २) श्री. चंद्रकांत शंकर भिडे, ठाणे | रू.१०,०००/- | देणगी |
| ३) श्री. श्रीधर विनायक भिडे, बोरिवली | रू. ५,०००/- | देणगी(कॉर्पस) |
| ४) डॉ. प्रशांत गजानन भिडे, चेंबूर | रू. ५,०००/- | देणगी |
| ५) श्रीमती मालती भार्गव भिडे, विलेपार्ले | रू. ३,००३/- | देणगी |
| ६) श्री. गोविंद के. भिडे, दादर | रू. २,०००/- | देणगी |
| ७) श्री. विलास कृष्णाजी भिडे (नाशीक) | रू. १,१००/- | देणगी |
| ८) श्री. सुभाष वामन भिडे, मालाड | रू. १,१००/- | देणगी |
| ९) श्रीमती दीपा एम. भिडे, माहीम | रू. १,०११/- | देणगी |
| १०) श्रीमती विनोदिनी भिडे, माटुंगा | रू. १,००१/- | देणगी |
| ११) श्री. श्रीराम अनंत भिडे, परळ | रू. १,००१/- | देणगी |
| १२) श्रीमती विजया मनोहर जोशी, विलेपार्ले | रू. १,०००/- | देणगी |
| १३) श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली | रू. १,०००/- | देणगी |
| १४) श्री. शरश्चंद्र विनायक भिडे, वांद्रे | रू. १,०००/- | देणगी |
| १५) श्रीमती जोत्स्ना अरविंद परचुरे, घाटकोपर | रू. ५०१/- | देणगी |
| १६) श्री. श्रीहरी त्रिंबक भिडे, ठाणे | रू. ५०१/- | देणगी |
| १७) श्री. अरुण एस्. भिडे, ठाणे | रू. ५००/- | देणगी |
| १८) श्री. मुकुंद दत्तात्रय भिडे | रू. ५००/- | देणगी |
| १९) श्री. यशवंत चिंतामण भिडे, मुंबई | रू. २००/- | देणगी |
| २०) श्री. यशवंत विनायक भिडे, गिरगाव | रू. १००/- | देणगी |
| २१) श्रीमती विमल रघुनाथ घाणेकर | रू. २,०००/- | वाढदिवस देणगी |
| २२) श्री. विद्याकर वासुदेव भिडे (पुणे) | रू. १,००१/- | वाढदिवस देणगी |
| २२) ले. क. सुनील वासुदेव भिडे, पुणे | रू. १,०००/- | वाढदिवस देणगी |
| २३) श्री. श्रीराम श्रीपाद भिडे, (चिपळूण) | रू. १,०००/- | वाढदिवस देणगी |
| २४) श्री. विठ्ठल दत्तात्रय भिडे, डोंबिवली | रू. ५००/- | वाढदिवस देणगी |
| २५) श्री. विलास श्रीपाद भिडे, दादर, मुंबई | रू. १,१००/- | आजीव सभासद |
| २६) श्री. मुकुंद मोरेश्वर भिडे, (लवेल, रत्नागिरी) | रू. १,०००/- | आजीव सभासद |
| २७) श्रीमती माधुरी विनायक भिडे, कल्याण | रू. १,०००/- | आजीव सभासद |
| २८) श्रीमती जयश्री प्रभाकर भिडे, डोंबिवली | रू. १,०००/- | आजीव सभासद |
| २९) श्री. उपेंद्र प्रभाकर भिडे, डोंबिवली | रू. १,०००/- | आजीव सभासद |
| ३०) श्रीमती वैशाली उपेंद्र भिडे, डोंबिवली | रू. १,०००/- | आजीव सभासद |
| ३१) श्रीकांत गणेश भिडे, चारकोप, कांदिवली | रू. १,०००/- | आजीव सभासद |
| ३२) श्री. यशवंत प. भिडे, ठाकुरद्वार | रू. १,०००/- | आजीव सभासद |
| ३३) श्री. विलास कृष्णाजी भिडे (नाशीक) | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ३४) श्री. चिंतामणी रावजी भिडे, कल्याण | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ३५) श्री. हेमंत रावजी भिडे, धासाई | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ३६) श्री. रामकृष्ण महादेव भिडे, डोंबिवली | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ३७) श्री. प्रभाकर लक्ष्मण भिडे, पुणे | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ३८) श्री. सुभाष वामन भिडे, मालाड | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ३९) श्री. वसंत भगवान पाटणकर, (पुणे) | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ४०) श्री. सुरेश गोपाळ भिडे, (नवलगुंद, कर्नाटक) | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ४१) सौ. सविता सुरेश भिडे, (नवलगुंद, कर्नाटक) | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ४२) डॉ. केशव श्रीपाद भिडे, बेंगलोर | रू. ९००/- | आजीव सभासद |
| ४३) डॉ. केशव श्रीपाद भिडे, बेंगलोर | रू. ३,०००/- | वैद्यकीय मदत निधी |
| ४४) श्री. श्रीरंग भगवान लोहोकरे, सांगली | रू. १,०००/- | वैद्यकीय मदत निधी |
| ४५) श्री. श्रीरंग भगवान लोहोकरे, सांगली | रू. १,०००/- | शुभचिंतक |

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी' वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर,
फोन नं. ०२३१-२५४०८२७

## आवाहन

९ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणी मधील १०० रु. चा सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केलेला आहे. त्यामुळे

**आश्रयदाता** - रु. १०,०००/-
**हितचिंतक** - रु. ५,०००/-
**आजीव सभासद** - रु. १,०००/-

हे तीनच वर्ग ठेवण्यात आलेले आहेत. तसेच या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्या अनुषंगे खालील निर्णय घेण्यात आला. ''जे सभासद १०० रुपये भरून सभासद झालेले आहेत, त्यांनी अधिक ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घ्यावे.'' अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान ९०० रुपये भरून आजीव सभासदत्व घेण्याचे विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे याची नोंद घ्यावी. ■

## निवेदन

आपले कुलबांधव/भगिनी/माहेरवाशिणी यांचेकडून 'आम्ही भिडे' अंकाच्या वर्गणीबाबत सातत्याने विचारणा होत आहे. हा अंक शक्यतो वर्गणी न घेता चालवायचा आहे. तरी सुद्धा ज्या कोणाला अंकासाठी हातभार लावावा असे वाटत असेल त्यांनी देणगी/मदत रोख अथवा चेकने पत्रव्यवहारासाठी दिलेल्या पत्त्यावर पाठवावी. चेक अथवा ड्राफ्ट 'नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान' या नांवानेच काढावा. त्याचप्रमाणे संपूर्ण अंकाचे प्रायोजकत्व सुद्धा स्वीकारले जाईल. ■

प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल डबीर RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)